# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट २१८-२२** **दिनांक २१/०७/२०२२**

## आकर्षक परतावा देण्याचे आमिष दाखवुन नागरिकांची फसवणुक करणा-यास अटक- माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी

काक इकोनॉमिक मार्केटींग प्रा. लि. कंपनीच्या प्रतिनिधीमार्फत हजारो नागरिकांना आकर्षक परताव्याचे आमिष दाखवुन कंपनीच्या विविध योजनांमध्ये पैश्यांची गुंतवणुक करण्यास भाग पाडुन व ठरल्याप्रमाणे परतावा तसेच मुद्दल रक्कम परत न देता नागरिकांची करोडो रुपयांची फसवणुक करणाऱ्या कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर व संचालकाविरुध्द आर्थिक गुन्हे विभाग, कक्ष-८, मुंबई येथे गु.र.क्र. ११/२०२२ भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, ३४ सह कलम ३, ४ एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९ अन्वये गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी हा मागील ६ महिन्यांपासुन स्वत:चे अस्तित्व लपवुन राहण्याची ठिकाणे वेळोवेळी बदलत असल्याने मिळुन येत नव्हता. आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथील पोलीस पथक हे मागील २ महिन्यापासुन त्याचा वसई-विरार परिसरामध्ये शोध घेत होते. माणिकपुर पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाने तांत्रिक तपास करुन आरोपीत नामे कैलाश अशोक काकडे, वय ४१ वर्षे, रा. वसई पश्चिम, जि. पालघर यास दिनांक २०/०७/२०२२ रोजी ताब्यात घेतले व आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथील पोलीस पथकाच्या स्वाधीन केले.

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०२, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली माणिकपुर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संपतराव पाटिल, स.पो.नि. सचिन सानप, पो.उ.नि. तुकाराम भोपळे, पो.ह. शैलेश पाटिल, शामेश चंदनशिवे, धनंजय चौधरी, अनिल चव्हाण, पो.शि. प्रविण कांदे तसेच आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई येथील पो.नि. सावर्डेकर व पथक यांनी केलेली आहे.

-------ooooo-------